**विद्यार्थी व पालकांनी द्यावयाचे बंधपत्र** दिनांक

विद्यार्थ्यांचे पूर्णनाव : ______________________________ प्रवर्ग सवलत: **SC Scholarship/ Freeship NT/OBC/SBC/EBC Concession**

प्रति, प्राचार्य,
एम ई एस वाडिया अभियांत्रियाकी महाविद्यालय, पुणे ४११००१.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रवेश घेताना ईबीसी / शिष्यवृत्ती / फ्रीशिप सवलत मिळणेबाबत हमीपत्र.**

**संदर्भ :- १) शासन निर्णय क्रमांक ईबीसी -२०१६/ प्र.क्र. २२१ / शिक्षण -१ दिनांक ३१ मार्च २०१६.**

**२) शासन निर्णय क्रमांक -२०१७/ प्र क्र ५२४ / शिक्षण -१ दिनांक २९ जानेवारी २०१८.**

**३) शासन निर्णय क्रमांक -भासशी-२०२२/ प्र क्र ७४/ शिक्षण -१ दिनांक १७ मार्च २०२२.**

१) मी / आम्ही खाली सही करणार / करणारे प्रतिज्ञापन करतो की, शिष्यवृत्ती मिळण्याबाबत शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती मला / आम्हाला मान्य आहेत. अर्जात वरीलप्रमाणे नमूद केलेली संपूर्ण माहिती पूर्णपणे सत्य आहे. सदरची माहिती खोटी अथवा अपुरी आढळल्यास भारतीय दंडविधाना प्रमाणे होणाऱ्या दंडास / शिक्षेस मी / आम्ही पात्र आहे / आहोत. अर्जात नमूद केलेल्या माहितीपैकी कोणतीही माहिती वा निवेदन चुकीचे आढळून आल्यास सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला निर्णय अंतिम असेल व तो माझ्यावर / आम्हावर बंधनकारक असेल, अशी मी / आम्ही हमी देतो. जर शिष्यवृत्तीची, शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम अनुज्ञेय रक्कमेपेक्षा अधिक मिळाली तर मी / आम्ही ती शासनास / महाविद्यालयास जमा करु, अशी जास्तीची अथवा अन्य कारणामुळे वसूल करण्यात येणारी रक्कम मी / आम्ही पूर्णपणे शासनास / महाविद्यालयास परत करण्याची हमी देतो.

२) **माझा ईबीसी / शिष्यवृत्ती / फ्रीशिप चा अर्ज महाडीबीटी पोर्टल वर ऑनलाईन भरण्याची जबाबदारी माझी असेल.** माझ्या कुटुंबाच्या उत्पन्नाची व जातीची अर्जात नमूद केलेली माहिती खोटी आढळल्यास माझ्या पाल्याच्या विरुद्ध होणाऱ्या कारवाईस मी / आम्ही स्वतः जबाबदार राहू. मी अर्जासोबत जोडलेली सर्व कागदपत्रे, मी सक्षम अधिकाऱ्याकडून / प्राधिकाऱ्याकडून प्राप्त केलेली असून, ती कागदपत्रे खरी असून योग्य मार्गाने मिळवलेली आहेत. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा फेरफार / दुरुस्ती / बदल केलेला नाही. सदरील कागदपत्रे, प्रमाणपत्रे खोटी अथवा नकली नाहीत हे मी सत्य प्रतिज्ञेवर लिहून देतो. अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे, प्रमाणपत्रे खोटे किंवा बनावट आढळल्यास त्यास मी / आम्ही पूर्णतः जबाबदार असून त्यासाठी भारतीय दंड विधान कायदा कलम १९९ व २०० नुसार लागू होणाऱ्या शिक्षेस मी/आम्ही पात्र राहू, याची मला/आम्हाला पूर्ण जाणीव आहे.

**३) सन २०२५-२६ या वर्षाची महाविद्यालयास देय असलेली शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व इतर शुल्काची रक्कम माझ्या आधार सलंग्न बँक खात्यावर जमा होताच, त्यापैकी महाविद्यालयास देय असलेली ६०% शिक्षण शुल्कची रक्कम सात दिवसांच्या आत महाविद्यालयात जमा करुन त्याची रीतसर पावती प्राप्त करुन घेण्याची माझी / आमची जबाबदारी असेल. शुल्क महाविद्यालयास जमा न केल्याने भविष्यात उदभवणा-या परिणामास मी / आम्ही वैयक्तीक जबाबदार असु असे प्रतिज्ञापूर्वक हमीपत्र / बंधपत्र मी / आम्ही सादर करीत आहोत.**

**४) संदर्भांकित शासन निर्णयानुसार जर मी प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमात दोन किंवा दोनपेक्षा जास्त वेळा पूर्णतः अनुत्तीर्ण झालो / झाले तर अभ्यासक्रमाच्या उर्वरित कालावधीसाठी सदर योजनेचा लाभ मिळण्यास मी पूर्णतः अपात्र असेल याची मला / आम्हाला पूर्ण कल्पना व जाणीव आहे. तसेच संदर्भांकित शासन निर्णया मधील सर्व अटी व शर्ती मला / आम्हाला मान्य आहेत.**

**५) जर मी/आम्ही प्रवेश घेतलेला अभ्यासक्रम मध्येच सोडला किंवा इतर कुठल्याही कारणामुळे माझा प्रवेश रद्द केला तर संदर्भांकित शासन निर्णयानुसार मला प्रदान करण्यात आलेली शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व इतर शुल्काची रक्कम महाविद्यालयास मी / आम्ही एकरकमी जमा करू अशी हमी देत आहोत.**

ठिकाण :

दिनांक :

( अर्जदाराच्या वडिलांची / पालकांची सही, पूर्ण नाव व संपर्क क्रमांक) ( विद्यार्थ्यांची सही व पूर्ण नाव )